महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(२) अन्वये जामनेर शहरासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे जामनेर ता.जामनेर येथील गट नं. २०६ क्षेत्र १.१८ हेक्टर जागा ना विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर करणेबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. टिपीएस-३५१९/१७९८/प्र.क्र.१९१/२०२०/नवि-०९**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक - २३ मार्च, २०२२.**

**शासन निर्णय**:- सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI सत्यमेव जयते

**( देवदत्त रहाणे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव , नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.
४) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
५) जिल्हाधिकारी, जळगांव.
६) सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव.
(त्यांना विनंती की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या ५ प्रती विहीत मार्गाने शासनास सत्वर सादर कराव्यात.)
७) मुख्याधिकारी, जामनेर नगरपरिषद, जामनेर जि. जळगांव
८) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.
(त्यांना विनंती की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नाशिक विभागीय पुरवणी भाग-एक मध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी १० प्रती हया विभागास व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवाव्यात.)
९) निवडनस्ती (कार्यासन नवि-०९)

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
अधिसूचना
दिनांक :-२३ मार्च, २०२२.

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:-*

**टिपीएस-३५१९/१७९८/प्र.क्र.१९१/२०२०/नवि-०९:-** ज्याअर्थी, शासन,नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस-३५१२/०३/प्र.क्र.०५(अ)/२०१२/नवि-९, दि.०९/०५/२०१२ अन्वये जामनेर शहरासाठी विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये भागशः मंजूर (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) असुन दिनांक २०/०६/२०१२ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी जामनेर नगरपरिषद नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे जामनेर ता.जामनेर येथील गट नं.२०६ क्षेत्र १.१८ हेक्टर ही जागा (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) ना विकास (यापुढे "उक्त भूवापर" असे संबोधले आहे) या वापर विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.०३, दिनांक ०५/१०/२०१८ अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करुन उक्त जागा उक्त भूवापर विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करण्याचे ठरवून उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव दि.३०/०५/२०१९ च्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव काही अटीसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन मालकानी शासनाच्या धोरणानुसार सन २०२१-२२ या वर्षातील बाजारमूल्यदर त्क्त्यातील उक्त जागेच्या मूल्याच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये ९४,४००/- सहायक संचालक नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक ०२/०३/२०२२ रोजी जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ९४,४००/-, मुख्याधिकारी, जामनेर नगरपरिषद, जामनेर या कार्यालयास दिनांक ०२/०३/२०२२ रोजी जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उपकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. ०९/०५/२०१२ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारीत करण्यात येत आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते

उक्त विकास योजना मंजुरीच्या दि.०९/०५/२०१२ रोजीच्या अधिसुचनेच्या फेरबदल सुचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

मौजे जामनेर ता.जामनेर येथील गट नं.२०६ क्षेत्र १.१८ हेक्टर ही जागा, ना विकास विभागातून वगळण्यात येत आहे व मुक्त झालेली जागा नकाशात दर्शविल्यानुसार, रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

सदरची अधिसूचना जनतेच्या अवलोकनार्थ, मुख्याधिकारी, जामनेर नगरपरिषद, जामनेर, जि. जळगांव यांच्या कार्यालयात, एका महिन्याच्या कालावधीसाठी, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

( देवदत्त रहाणे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400032.**

**NOTIFICATION**

**Dated:- 23rd March, 2022**

*Maharashtra Regional & Town Planning Act, 1966*

**No.TPS-3519/1798/CR-191/2020/UD-09**: Whereas, the Government in Urban Development Department, vide Notification No.TPS-3512/03/CR-05(A)/2012/UD-09,dated 09/05/2012 has Partly sanctioned the Development Plan for Jamner City (hereinafter referred to as ' the said Development Plan') under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same has come into force with effect from dated the 20/06/2012;

And whereas, the Jamner Municipal Council is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority");

And whereas, in the said Development Plan, land bearing Gut No.206, admeasuring 1.18 Hectors of Mouje Jamner (hereinafter referred to as "the said lands") is included in "No Development Zone" (hereinafter referred to as "the said Zone");

And whereas, the said Planning Authority vide its General Body Resolution No. 03, dated 05/10/2018 resolved to modify the said Development Plan by deleting the said land from the said use and to be included in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification Proposal ") by carrying out a modification to the said Development Plan, by following all the legal formalities stipulated under the said Act, forwarded the proposal to Government for sanction vide letter dated 30/05/2019;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned subject to conditions ;

And whereas, the land Owners of the said land as per the Government policy have deposited Rs. 94,400/- towards the 50% Government share of premium amount as per the 5% rate of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2021-22 in the Government Treasury on 02/03/2022 through the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch, Jalgaon and remaining 50% of the premium amount Rs. 94,400/- payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Jamner Municipal Council , Jamner on 02/03/2022;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (2) of section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated 09/05/2012.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

"In the Schedule of Modifications appended to the aforesaid Notification dated 09/05/2012 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry –

**ENTRY**

"The land bearing Gut No.206 area 1.18 Hectors of Mouje Jamner is deleted from No Development Zone and land thus released, is included in Residential Zone as shown on the plan.

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours, for the period of one month in the office of the Chief Officer, Jamner Municipal Council, Jamner District Jalgaon.

This notification shall also be published on the Government web-site www.maharashtra.gov.in

***By order and in the name of the Governor of Maharashtra.***

(Deodatta Rahane)
**Section Officer to Government**